नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 15/12/2022 (गुरूवार) सकाळ

## गैरकायदयाची मंडळी जमवून मारहाण करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत मौजा पारशिवनी येथे दिनांक १४/१२/२०२२ चे १९.०० वा. ते २१.०० वा. दरम्यान दरम्यान यातील नमुद आरोपी नामे— १) मनोज सुखदेव बिरातल, वय ४९ वर्ष, रा. नयाकुंड २) सौ. जानकी मनोहर बिरातल, वय ४५ वर्ष, रा. नयाकुंड ३) शुभम मनोहर बिरातल, वय २७ वर्ष, रा. नयाकुंड ४) सौ ममता उर्फ लता राजु धनोले, वय ३५ वर्ष, रा. नयाकुंड ५) मोहन उर्फ तोताराम तिलंकचंद धनोले, वय ५२ वर्ष, रा. नयाकुंड ६) राजु तिलंकचंद धनोले, वय ४८ वर्ष, रा. नयाकुंड यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादी नामे— ग.भा. मिराबाई भोजराजजी निबोने, वय ८४ वर्ष, रा. नयाकुड यांचे घराचे दार तोडुन आत प्रवेश करून फिर्यादीचे डोक्याचे केस पकडुन आंगणात आणले व जादुटोना केल्याचे संशयावरून फिर्यादीला काठीने डावे हातावर व कंबरेवर मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३, १४७, १४९, ३२४, ४५२, ५०६ भादवि. सहकलम २(१)(ख), ३ महाराष्ट्र जादुटोना अधिनियम २०१३ सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिलीप बासोडे मो.क्र. ९८२३०८३९०५ हे करीत आहे.

## चोरी

**१) पो.स्टे. सावनेर** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील तेलकामठी येथे दिनांक १४/१२/२०२२ चे ०४.०० वा. ते ०६.०० वा. सुमारास फिर्यादी नामे— अक्षय दिलीप कन्हेरे, वय २७ वर्षे, रा. वार्ड क्र ०२ तेलकामठी यांची काकु नामे— सौ. वैशाली दत्ताजी कन्हेरे, वय ५८ वर्षे, न्यु गणेश कॉलनी गोपाल नगर नागपुर हीच्या नावाने असलेले हिरव्या रंगाचे जॉन डियर ५१०४ कंपनीचे ट्रॅक्टर क्र. एम. एच—४०/एल ७८६० किंमती अंदाजे ९०,०००/—रू. व हिरव्या रंगाचे ट्रॉली क्र. एम. एच—४०/एल—१३९ किंमती अंदाजे ४०,००० रू. जुनी वापरती हे फिर्यादी शेतीच्या कामासाठी व दुसऱ्याचे शेतात भाडयाने चालवित होता. फिर्यादीने सदर ट्रॅक्टर ट्रॉलीसह स्वत:च्या घराच्या समोर खुल्या भुखंडावर उभे करून ठेवले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने स्वत: चे आर्थिक फायदयासाठी १,३०,०००/—रू. चा मुद्देमाल ट्रॅक्टर ट्रॉलीसह चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक ब. नं. १००१ प्रकाश ठोके मो. नं. ८२०८९०१२१९ हे करीत आहे.

२) पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील मौजा ब्राम्हणी येथे दिनांक १३/१२/२०२२ चे २२.३० वा. ते दि. १४/१२/२०२२ चे ०६.३० वा. फिर्यादी नामे– नंदू रमेश साबळे, वय ४० वर्ष, रा. बुधवार बाजार ब्राम्हणी याने मंगेश देवराव गोतमारे यांचेकडून दिनांक २८/११/२०२२ रोजी ट्रॅक्टर महिंद्रा क्र. एम.एच– ४०, एल– ९२८४ चा खरेदीचा सौदा ३ लाख ७५ हजार मध्ये केला होता व त्याचे १,००,०००/– रू. नगदी देवून उर्वरित मार्च महिन्यामध्ये देण्याचे ठरले होते तरीही फिर्यादीने दिनांक ०२/१२/२०२२ रोजी ट्रॅक्टर आपले ताब्यात घेवून ट्रॅक्टरची दुरूस्ती करून दिनांक ०७/१२/२०२२ रोजी सायंकाळी १६.३० वा. घरासमोरील अंगणात लॉक करून ठेवले होते. नमुद घटना वेळी फिर्यादी हा वॉटर सप्लाय कामावर गेला असता कोणीतरी अज्ञात चोराने ट्रॅक्टर महिन्द्रा क्र. एम.एच– ४०/एल– ९२८४ किंमती अंदाजे २,००,०००/– रूपयाचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ग्रेड पोलीस उपनिरीक्षक पाली मो. क्र. ९०११०३८६७७ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर